SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४, महाराष्ट्र
BARR. BALASAHEB KHARDEKAR KNOWLEDGE RESOURCE CENTER
बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र

Estd. 1962
NAAC 'A' Grade

Phone (Direct) : +91-0231- 2609204, Office : 2609205, Deputy Librarian : 2609210,
Asst. Librarian : 2609421, 2609212 Stack : 2609212, Circulation : 2609210,
Periodical : 2609208, Archival : 2609336, Reference : 2609209
Website : URL : http://www.unishivaji.ac.in/library E-mail : subbkl@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/BBKKRC/ 131
शि.वि./बॅ.बा.ख.ज्ञा.स्त्रो.कें./

Date :
दिनांक : 15 NOV 2019

# ग्रंथालय परिपत्रक

दि.15/07/2017 रोजी संपन्न झालेल्या ग्रंथालय समितीच्या ठराव क्र.11 व त्यास व्यवस्थापन परिषदेची दि.09/10/2017 आणि 23/10/2019 ची मान्यता या अन्वये पी. एच. डी. व एम .फिल थेसिसची जादाची प्रत संबंधित संशोधकाला किंवा संशोधन मार्गदर्शक यांना दयावयाचे ठरले आहे. सर्व पी. एच.डी. थेसिस डिजिटायझेशनद्वारे इन्फिलबनेट (INFLIBNET) च्या shodhgana website (shodhganga.inflibnet.ac.in) वर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्यामुळे सदर थेसिसची एक प्रत ज्ञान स्त्रोत केंद्रामध्ये ठेऊन दुसरी प्रत संबंधित संशोधकास किंवा संशोधन मार्गदर्शक यांना परत करण्यात येणार आहेत. तरी संबंधित संशोधकांनी किंवा संशोधन मार्गदर्शकांनी दि.15/11/2019 ते 30/11/2019 या दरम्यान आपली प्रत बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राच्या संदर्भग्रंथ विभागातून सकाळी 11.00 ते 2.00 व दुपारी 3.00 ते सायं 5.00 या वेळेत घेऊन जावी. सदरचा आपला किंवा विद्यार्थ्यांचा थेसिस घेण्यासाठी फक्त संशोधकाने स्वतः किंवा संशोधन मार्गदर्शकाने स्वतः येवून स्वतःची किंवा विद्यार्थ्यांची (त्यासाठी स्वतःच्या/ विद्यार्थ्यांच्या थेसिसवरील नावाशी साम्य असणारे एखादे ओळखपत्र सोबत आणावे) व आपली ओळख पटवूनच आपला/ विद्यार्थ्यांचा थेसिस घेवून जावे. इतर कोणत्याही व्यक्तीला थेसिस दिला जाणार नाही यांची संशोधकांनी व संशोधन मार्गदर्शकांनी नोंद घ्यावी. Ph.D / M.Phil थेसिस नेण्यास येण्यापूर्वी संशोधकांनी/संशोधक मार्गदर्शकांनी 0231 – 2609209 या क्रमांकावर संपर्क साधून आपला थेसिस ज्ञान स्त्रोत केंद्रात उपलब्ध आहे किंवा नाही याची खात्री करूनच तो थेसिस घेण्यासाठी यावे. त्याकरिता डॉ. आर. डी. खामकर, श्री. आर. एस. बचाटे यांचेशी संपर्क साधावा (फोन 0231–2609209)दि.30/11/2019 नंतर सदर थेसिस देण्यात येणार नाहीत याची संशोधकांनी / संशोधन मार्गदर्शकांनी दखल घ्यावी. ज्ञान स्त्रोत केंद्राकडे फक्त 2010 पूर्वीच्या प्रबंधांची जादा प्रत उपलब्ध असल्याने त्या वर्षातील पी.एच.डी प्राप्त संशोधकांनी याबाबत संपर्क साधावा.

Bhat 15/11/19
संचालक

बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद